# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग
## सुधारित परिपत्रक

विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ३० जून, २०१० रोजीची अधिसूचना आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या आणि चौथ्या सुधारणेच्या (3rd & 4th Amendment) अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे ६ व्या वेतन आयोगानुसार नव्याने सहाय्यक प्राध्यापक - स्टेज १ ते २ (एजीपी ६००० ते ७०००) व स्टेज २ ते ३ (एजीपी ७००० ते ८०००) मध्ये कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती केंद्रीय पध्दतीने करणेबाबत दि. ०६ डिसेंबर, २०१८ च्या व्यस्थापन परिषदेच्या ठराव क्र. ४१ तसेच सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक - स्टेज ३ ते ४ (एजीपी ८००० ते ९०००) मध्ये कॅस अंतर्गत पदोन्नती केंद्रीय पध्दतीने करणेबाबत दि. ३० जानेवारी, २०१९ च्या विद्यापरिषदेमध्ये ठराव क्र. ५९(१५) आणि दि. २० फेब्रुवारी, २०१९ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. १५(८) अन्वये ठराव झालेला आहे. त्यानुषंगाने सहाय्यक प्राध्यापक - स्टेज १ ते २, स्टेज २ ते ३ आणि सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक (स्टेज ३ ते ४) यांचे स्थाननिश्चिती / पदोन्नतीसाठी शिबीराचे आयोजन विद्यापीठामार्फत केले जाणार आहे.

याबाबत प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेचे प्राचार्य / संचालक, संस्थाचालक व सर्व संबंधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सद्य स्थितीत महाविद्यालयाच्या सेवेत असलेल्या शिक्षकांचे विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ३० जून, २०१० रोजीची अधिसूचना आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या आणि चौथ्या सुधारणेच्या (3rd & 4th Amendment) अनुषंगाने स्थाननिश्चिती / पदोन्नतीकरण्याकरिता पात्र असलेल्या शिक्षकांचे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद कागदपत्रासह **दि. १५/०४/२०१९ पर्यंत** तीन प्रतीमध्ये (हार्ड आणि सॉफ्ट कॉपी) प्रस्ताव शैक्षणिक, संशोधन आणि विकास या विभागाकडे विहित मार्गाने व विहित शुल्कासह सादर करावेत.

| **स्थाननिश्चिती / पदोन्नती स्टेज** | **एजीपी** | **शुल्क रु.** |
|---|---|---|
| सहा. प्राध्यापक स्टेज १ ते २ | ६००० ते ७००० | ३०००/- प्रती प्रस्ताव |
| सहा. प्राध्यापक स्टेज २ ते ३ | ७००० ते ८००० | ३०००/- प्रती प्रस्ताव |
| सहा. प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक स्टेज ३ ते ४ | ८००० ते ९००० | ५०००/- प्रती प्रस्ताव |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे शुल्क वित्त व लेखा विभागाकडे भरुन पावती प्रस्तावासह जोडणे अनिवार्य आहे.

१. स्थाननिश्चितीसाठी ६ व्या वेतन आयोगानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०/०६/२०१० रोजीची अधिसूचना आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या आणि चौथ्या सुधारणेतील (3rd & 4th Amendment) एपीआय पध्दतीनुसार कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

२. ज्या शिक्षकांच्या सेवेत १८० दिवस अथवा त्यापेक्षा कमी कालावधीचा सेवाखंड असेल अशा शिक्षकांचा संबंधित सेवाखंड रितसर क्षमापित केलेला असेल तर सेवाखंडाचा कालावधी वगळून त्या पूर्वीची व नंतरची सेवा स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

३. १८० दिवसापेक्षा जास्त सेवाखंड असला आणि असा सेवाखंड जरी क्षमापित केला असला तरी सेवाखंडानंतरचीच शिक्षकांची सेवा ग्राह्य धरण्यात येईल.

४. शोधनिबंधाचे पुरावे जोडतांना (ISSN No., Impact factor, Journal Name, Publication) इ. माहिती असणारे कमीत कमी पाने जोडावीत (पूर्ण शोध निबंध जोडू नये).

(P.T.O.)

५. पुस्तकांचे पुरावे जोडताना Name of book, Author names, ISBN, Publisher, National/International/Other इ. सदर माहिती असणारे कागदपत्रे जोडावीत (पुस्तक जोडू नये).

६. सहाय्यक प्राध्यापक (Selection Grade) पदाची पदोन्नती तारीख ०१/०१/२०१० नंतर असेल तर CAS अंतर्गत फॉर्ममधील Category I, II and III युजीसीच्या API फॉर्ममध्ये २००९ पासून ते पदोन्नती तारखेपर्यंत एक-एक वर्षानुसार भरावेत.

७. ज्या प्राध्यापकांची निवडश्रेणीची तारीख १५ एप्रिल, २०१९ ते ३० जून, २०१९ या दरम्यान आहे आणि त्यांचा पात्रता निकष पूर्ण करणारा API १५ एप्रिल, २०१९ पूवी भरत असल्यास, अशा प्राध्यापकांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत.

८. ज्या प्राध्यापकांची CAS अंतर्गत निवडश्रेणी विहित तारखेच्या पुढे गेलेली असेल अशा प्राध्यापकांना फेरप्रस्ताव दाखल करण्यास सातव्या वेतन आयोगाच्या Misc-२०१८/C.R.५६/१८/UNI-१ दि. ०८/०३/२०१९ या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे सहाय्यक प्राध्यापक स्टेज १ ते २, स्टेज २ ते ३ आणि सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक (स्टेज - ३ ते ४) मध्ये पात्र शिक्षकांची कॅस अंतर्गत केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती / पदोन्नतीसाठी अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर **Academic, Research and Development** या मथळ्याखाली **Teacher Approval Section (UGC)-II** या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे यथोचित कार्यवाही करावी.

जा.क्र.: पुअहोसोविसो/शैसंवि/शि.मा-२/२०१८-१९/2319 (म. सं. रोकडे)
दिनांक : 2 6 MAR 2019 उपकुलसचिव

**सोबत:** नियमावली व प्रोफॉरमा

**प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. विहित नमुन्यातील प्रोफॉरमा
२. IQAC समितीचा अहवाल
३. विद्यापीठ मान्यता पत्र
४. संबंधित शिक्षकांचे चेंजेस इन स्टाफ
५. शिक्षकांचा सेवाखंड क्षमापित केलेला असल्यास विद्यापीठ मान्यता पत्र
६. महाविद्यालयाचे नेमणूक पत्र व रूजू अहवाल
७. संबंधित शिक्षकांचे उद्‌बोधन/उजळणी वर्ग अथवा प्रोग्राम (Refresher Course/Orientation Course/ Short Term Course)
८. वेतननिश्चती प्रमाणपत्र
९. शैक्षणिक अर्हतेबाबतचे गुणपत्रक व प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती
१०. संबंधित शिक्षकाबाबत न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबतची माहिती